माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ११७६/२०२३**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. प्रदिप परमेश्वरराव मस्के, रा. उमरी(मेघे), पो. हिंदनगर, ता.जि. वर्धा | ग्राम महसुल अधिकारी, उमरी(मेघे), ता.जि. वर्धा | तहसिलदार, तहसिल कार्यालय, वर्धा, ता.जि. वर्धा |

**सुनावणी दिनांक :- ०८.०१.२०२६**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : २७.०४.२०२३

(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : २७.०४.२०२३

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अपूर्ण माहिती दिल्यामुळे.

(४) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २१.१२.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१.१२.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : ऑगस्ट, २०२२ ते आजपावेतो.

(४) **जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** १) मौजा उमरी (मेघे) येथील शेत सर्व्हे नं. १७२ हे शेत वैशाली रविंद्र भरडकर यांनी खरेदी केलेले आहे. त्यांनी फेरफार करण्याकरिता सादर केलेल्या अर्जासह संपूर्ण कागदपत्राची सत्यप्रती देण्यात यावी. २) फेरफार क्रं. ९२६३ ची सत्यप्रती देण्यात यावी, याबाबत दोन मुद्यांवर माहिती मागितलेली आहे.

(५) **जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मागीतलेली माहितीबाबत मौजा

उमरी मेघे येथील सर्व्हे क्र. १७२ बाबत चे सदर दस्त ऑनलाईन प्राप्त झाल्यामुळे सदर दस्तची ऑनलाईन नोंद घेण्यात आलेली आहे. सदर दस्ताची प्रत पाहिजे असल्यास सह दुय्यम निबंधक वर्धा २ यांचे कडून प्राप्त करुन घेण्यात यावे, असे अपिलार्थीस कळविले.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०५.०१.२०२३

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०१.२०२३

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : अपूर्ण माहिती दिल्यामुळे.

(४) **अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही** : अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, वर्धा यांनी दिनांक ०९.०२.२०२३ रोजी सुनावणी घेवून, अपिलकर्ता यांनी मागणी केलेल्या माहितीचा कार्यालयातील उपलब्ध अभिलेखामध्ये शोध घेवून ती अपिलकर्ता यांना १५ दिवसाचे आत पुरविण्यात यावी. माहिती उपलब्ध नसल्यास तसे अपिलकर्ता यांना लेखी कळवून त्याची एक प्रत प्रथम अपिलीय अधिकारी यांना सादर करावी, असे आदेशीत केले.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसुल अधिकारी, उमरी(मेघे), ता.जि. वर्धा श्री. श्री. लिलाधर खवास उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, वर्धा, ता.जि. वर्धा, श्री. संदिप पुंडेकर उपस्थित आहेत.

२. आज सुनावणी दरम्यान प्राधिकरणाच्या वतीने नमूद केले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागीतलेली माहितीबाबत मौजा उमरी मेघे येथील सर्व्हे क्र. १७२ बाबत चे सदर दस्त ऑनलाईन प्राप्त झाल्यामुळे सदर दस्तची ऑनलाईन नोंद घेण्यात आलेली आहे. सदर दस्ताची प्रत अपिलार्थी यांना पाहिजे असल्यास सह दुय्यम निबंधक वर्धा २ यांचे कडून प्राप्त करुन घेण्यात यावे, असे अपिलार्थीस कळविले. तसेच अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, वर्धा यांनी दिनांक ०९.०२.२०२३ रोजी सुनावणी घेवून, अपिलकर्ता यांनी मागणी केलेल्या माहितीचा कार्यालयातील उपलब्ध अभिलेखामध्ये शोध घेवून ती अपिलकर्ता यांना १५ दिवसाचे आत पुरविण्यात यावी. माहिती उपलब्ध नसल्यास तसे अपिलकर्ता यांना लेखी कळवून त्याची एक प्रत प्रथम अपिलीय अधिकारी यांना सादर करावी, असे आदेशीत केले.

३. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी मागीतलेली माहिती अपूर्ण दिलेली आहे. त्यामुळे संपूर्ण माहिती देण्याबाबत संबंधीतांना आदेशीत करावे.

**६. निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग पुढील निष्कर्षाप्रत येत आहे.

१. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेली माहिती व उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती पुरविण्यात आली असल्याचे प्राधिकरणाने स्पष्ट केले असले तरी, अपिलार्थी यांच्या म्हणन्यानुसार त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण व चुकीची असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे आयोगाचे आदेश प्राप्त होताच अपिलार्थीस कार्यालयात बोलावून त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात अवलोकनाची संधी प्रदान करण्यात यावी.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसुल अधिकारी, उमरी(मेघे), ता.जि. वर्धा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ८ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २१.१२.२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहिती संदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी ८ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन ५० पृष्ठापर्यंतची माहिती १५ दिवसात समक्ष/नोंदणीकृत टपालाने विनामुल्य पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही, त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर अपिलार्थी यांना १५ दिवसांत पाठवावे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०८.०१.२०२६**

जावक क्रमांक 1321 दिनांक 17 FEB 2026